# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५
दूरध्वनी क्र. (०२२) २२१६ ३९ ६४ / ६५ / ६९, फॅक्स क्र. : (०२२) २२१६ ३९ ७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.mercindia.org.in /www.merc.gov.in


जाहिरात क्र. १२/२०१३-१४

## मुंबई शहरात आणि मुंबई उपनगर क्षेत्रातील काही भागात विजेचे वितरण करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्तीकरिता आमंत्रण

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) महाराष्ट्र राज्यात विद्युत क्षेत्रात एक नियामक म्हणून कार्य करीत असून त्या अनुषंगाने आपले अधिकार वापरत आहे. ज्या व्यक्तींना राज्यात विजेचा पारेषण परवानाधारक, वितरण परवानाधारक आणि विजेचा व्यापारी म्हणून काम करण्यासाठी परवाना हवा असेल त्यांना विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (डी) सह कलम १४ अंतर्गत आयोगाने परवाना द्यावयाचा असतो.

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (येथून पुढे ''टीपीसी'' म्हणून संबोधण्यात आले आहे) ही मुंबईमध्ये विजेची निर्मिती, पारेषण, वहन आणि किरकोळ पुरवठा ही विद्युत क्षेत्राशी संबंधित सर्व कामे करणारी एक कंपनी आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २००८ नुसार, टीपीसी-डी चे वीज पुरवठ्याचे क्षेत्र खालीलप्रमाणे आहे :-

**पुरवठ्याचे क्षेत्र**

''४.१ (१) दि बॉम्बे (हायड्रो-इलेक्ट्रिक) लायसन्स, १९०७; (२) दि आंध्र व्हॅली (हायड्रो-इलेक्ट्रिक) लायसन्स, १९१९; (३) दि निळा मुळा व्हॅली (हायड्रो-इलेक्ट्रिक) लायसन्स, १९२१; (४) दि ट्रॉम्बे थर्मल पॉवर इलेक्ट्रिक लायसन्स, १९५३ (एकत्रितपणे ''टीपीसी लायसन्सेस'' म्हणून संबोधण्यात आलेली) यामध्ये वर्णन करण्यात आलेल्या संपूर्ण क्षेत्रात, या टीपीसी लायसन्सेसमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबींना अधीन राहून, वितरण परवानाधारक वीज पुरवठा करण्यास प्राधिकृत राहील.

४.२ अधिनियमांतील तरतुदींनुसार सर्व प्रयोजनांसाठी जनतेला वीज पुरवठा करण्यास वितरण परवानाधारक प्राधिकृत राहील.

**५.परवान्याची मुदत**

अधिनियमातील तरतुदींना अधीन राहून, दिनांक १५ ऑगस्ट, २०१४ पर्यंत परवाना अंमलात राहील म्हणजेच अधिनियमांनुसार जोपर्यंत टीपीसी वितरण परवानाधारक असल्याचे मानण्यात येईल त्या उर्वरित कालावधीपर्यंत''.

टीपीसी-डी चा सदर परवाना १५ ऑगस्ट, २०१४ पर्यंत वैध आहे.

जुलै, २०१३ अखेर टाटा पॉवर कंपनी लिमिटेड-वितरण व्यवसायाकडे (ज्यास येथून पुढे ''टीपीसी-डी'' म्हणून संबोधण्यात आले आहे) सुमारे ४७५ चौ. कि.मी.च्या कार्यक्षेत्रात ४,१४,९३७ ग्राहक आहेत. टीपीसी-डी निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक अशा विविध ग्राहकांना विजेचा पुरवठा करते. टीपीसी-डीच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रातील एकूण ग्राहकांपैकी सुमारे ८७ टक्के निवासी ग्राहक, तर १०.६७ टक्के वाणिज्यिक आणि १.८२ टक्के औद्योगिक ग्राहक आहेत. मुंबईतील वितरण क्षेत्रात ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी टीपीसी-डीच्या पायाभूत विद्युत जाळ्यात १९ रिसिव्हींग केंद्रे, ६२८ वितरण ट्रान्सफॉर्मर उप-केंद्रे आणि २७१९ सर्किट किलोमीटर लांबीच्या ३३ केव्ही, २२ केव्ही, ११ केव्ही आणि लघुदाब जाळ्याचा समावेश होतो. बहुतांश रिसिव्हिंग केंद्रे आणि वितरण उप-केंद्रे ही इमारतींमध्ये उभारण्यात आली आहेत. संपूर्ण विद्युत जाळे (काही जमिनीवरील वाहिन्या वगळून) हे भूमिगत केबल यंत्रणेच्या माध्यमातून उभारण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये ६६५० दशलक्ष युनिट्सचा ऊर्जा पुरवठा वितरण यंत्रणेला करण्यात आला होता. आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये वितरण हानी १.१ टक्के होती.

आयोग, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (डी) सह कलम १४ अन्वये, वीज वितरणाच्या कामात तज्ज्ञ असलेल्या कन्सोर्टिअम/जॉइंट व्हेंचरसह संभाव्य अर्जदारांकडून, टीपीसीच्या वर उल्लेखिलेल्या मुंबई शहरातील आणि उपनगरातील काही भागातील वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात वीज वितरणाचे काम करण्यासाठी आणि त्यासंबंधात वितरण परवाना मिळविण्यासाठी, 'स्वारस्याची अभिव्यक्ती' कळविण्यासाठी अर्ज मागवीत आहे. इच्छुक अर्जदारांनी 'स्वारस्याची अभिव्यक्ती' कळविताना ते सेवा देण्यासाठी पात्र आहेत हे दाखविणाऱ्या त्यांच्या क्षमता व अनुभव यासंबंधीचे एक विवरणपत्र (माहिती पत्रक, यासारख्या करीत असलेल्या कामाचा तपशील, सारख्याच परिस्थितीतील कामाचा अनुभव, योग्य कुशलता असलेल्या कर्मचाऱ्यांची उपलब्धता, इ.) पाठवावे. तसेच, त्यांची अधिकारपत्रे दाखविणारा अन्य तपशील पाठवावा ज्यात संस्थेची संरचना, कार्यालयांची संख्या, मनुष्यबळ व वित्तीय दर्जा इ. समाविष्ट असेल. इच्छुक अर्जदारांनी त्यांच्या कंपनीची रुपरेखा आणि त्यांच्या मागील १० वर्षातील कामगिरीची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे सादर करावी :-

१. इच्छुक अर्जदाराचे नाव आणि पत्ता
   - अ. संस्थेचा प्रकार व स्थापन झाल्याचे वर्ष
   - ब. कायदेशीर दर्जा
   - क. नोंदणी / संलग्नीकरण
   - ड. कोलॅबोरेशन / जॉइंट व्हेंचर (असल्यास)

२. अशाच कामातील अनुभव व केलेल्या कामाची व्याप्ती

३. सविस्तर प्रशिक्षण अनुभव / वीज वितरण व्यवसायाचा अनुभव

४. मागील तीन वर्षांच्या ताळेबंदांच्या प्रती

५. सविस्तर रुपरेखा / (राष्ट्रीय आणि आंतर-राष्ट्रीय स्तरावरील) कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती (सीव्ही)

स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करताना आंतर-राष्ट्रीय / राष्ट्रीय बोलीदार त्यांना ज्या क्षेत्रात काम करण्याची इच्छा आहे अशा क्षेत्रातील क्षमता वाढविण्यासाठी अन्य व्यक्ती / संस्थांबरोबर सहभागी होऊ शकतील.

इच्छुक व्यक्ती / संस्थांना, त्यांची स्वारस्याची लेखी अभिव्यक्ती, क्षमता आणि अनुभव दर्शविणाऱ्या माहितीसह, खालील पत्त्यावर उशिरात उशिरा **दिनांक ३१ जानेवारी, २०१४** रोजी **संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत** मिळेल अशा रितीने पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे.

**सचिव**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५

या संबंधात कोणतीही माहिती हवी असल्यास, संभाव्य बोलीदार, टीपीसी-डी कंपनीशी खालील पत्त्यावर संपर्क साधू शकतील :-

**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड,**
धारावी रिसिव्हींग केंद्र, शालीमार इंडस्ट्रिअल इस्टेट जवळ, माटुंगा (पूर्व), मुंबई ४०० ०१९

तसेच ते आयोगाच्या **www.mercindia.org.in** / **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावरुन देखील उपलब्ध माहिती घेऊ शकतील.

कोणत्याही इच्छुक व्यक्तीचा अर्ज, कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क आयोग राखून ठेवीत आहे.

आयोगाच्या आदेशावरुन,

ठिकाण : मुंबई — सही/-

दिनांक : १ जानेवारी, २०१४ — सचिव, मविनिआ

**Size : 12 (W) x 27 (H) = 324 SQC**